**प्रस्तावना :**

प्राचीन भारतीय संस्कृतीनं मानव धर्माचं पालन कसं करावं? संस्कार म्हणजे काय? संस्कृती म्हणजे काय ? हे शिकवलं. अगदी अनादी काळापासून ही भारतवर्षाची संस्कार - संस्कृती एका पिढीतून दुसऱ्या पिढीत संक्रमित होत राहिली. त्यातूनच माणसाचं माणूसपण टिकवून त्याला परमस्वरुप देण्याचा प्रयत्न भारतीय संस्कृतीनं सातत्याने केला.[१] असे असले तरी, प्राचीन काळापासून आजपर्यंत भारतीय राजकीय व्यवस्था, समाजव्यवस्था आणि संस्कृतीमध्ये वेगवेगळ्या कालखंडात स्थित्यंतरे घडून आल्याचे दिसते. ही स्थित्यंतरे कधी शांततेच्या मार्गाने, तर कधी संघर्षाच्या मार्गाने झाली. बहुतांश प्रसंगी ही स्थित्यंतरे संघर्षाच्या मार्गाने झाल्याचे प्रत्ययास येते. उदा. प्राचीन काळी रावणाची अनियंत्रित राजसत्ता आणि बोकाळलेली समाजव्यवस्था नष्ट करण्यासाठी प्रभुरामचंद्रांना जन्म घ्यावा लागला.[२] श्रीमद्‌भगवद्‌गीतेमध्ये भगवान श्रीकृष्ण स्वतः म्हणतात.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत |

अभ्युत्थानमधर्मस्य तदात्मानं सृजाम्यहम् ||

म्हणजे जेंव्हा समाजात अधर्मी सत्ता निर्माण होईल तेव्हा मी (भगवंत) जन्म घेईन.[३] यावरुन हे स्पष्ट होते, की प्राचीन काळी देव आणि अधर्मी समाज यांत संघर्ष होऊन राजकीय व्यवस्था आणि

समाजव्यवस्था यांमध्ये परिवर्तन झाले. थोडक्यात, या कथा व आख्यायिकांवरुन हे स्पष्ट होते, की प्राचीन काळी देवालाच राज्यसुधारक आणि समाजसुधारक व्हावे लागले.

मध्ययुगीन कालखंडात परकीय मुस्लिम राज्यकर्त्यांची आक्रमने भारतावर झाली आणि ती जिंकून त्यांनी भारतीय राजकीय व्यवस्थेच्या शोषणाला सुरुवात केली. भारतीय संस्कृती आणि राज्य व्यवस्थेला मोगलांच्या हिरव्या अजगराचा विळखा पडला तो तब्बल ६५० वर्षे. याच काळात भारतीय समाजव्यवस्थेमध्ये सुधारणा घडवून आणण्यासाठी संतपरंपरेला सुरुवात झाली. थोडक्यात, मध्ययुगात परकीय मुस्लिम सत्ता आणि स्थानिक राज्यकर्ते यांच्यात संघर्ष होऊन राजकीय स्थित्यंतर झाले. तर संत नामदेव, संत कबीर यांच्या विचारातून समाजपरिवर्तन झाले. मानवी जीवन जगत असताना सुख-दुःखाची भरती-ओहोटी सातत्याने येत असते. मानवी मन एवढे चंचल असते, की आलेल्या सुखाने ते हुरळून जाते तर दुःखाने होरपळून जाते. या मनाला स्थिर करणे अवघड असते. संत तुकाराम, संत नामदेव, संत कबीर, संत ज्ञानदेव आदी संतांनी मानवी मनाचा विकास, सामाजिक मूल्य, पर्यावरण, अध्यात्म, सेवा परमोधर्मः आदी मूल्यांचे मार्गदर्शन आपल्या अभंग, ओव्यांतून केले. या संस्कृतीला नूसते विकसितच केले नाही तर समस्त मानव जातीला उपदेश करणाऱ्या साहित्याने सजवले आणि त्यातूनच सामान्य माणसाला अध्यात्माचा मार्ग दाखवून भारतीय संस्कृतीचे पुनरुज्जीवन केले.

आधुनिक कालखंडात भारतीय राजकीय व्यवस्था ब्रिटिशांच्या आधिपत्याखाली होती. ब्रिटिशांनी भारतात राजकीय सत्ता प्रस्थापित केली असली तरी राज्यकारभाराच्या सोयीसाठी का होईना भारतात शिक्षण, दळणवळण यांसारख्या सुविधा निर्माण केल्या. पाश्चात्त्य शिक्षण घेऊन भारतात उच्चशिक्षितांचा वर्ग निर्माण झाला. या उच्चशिक्षित वर्गामध्ये भारतीय समाजव्यवस्था आणि राजकीय व्यवस्था यात

सुधारणा घडवून आणण्यासाठी राजा राममोहन रॉय, स्वामी विवेकानंद, स्वामी दयानंद सरस्वती, लोकमान्य टिळक यांसारख्या विचारवंतांचा आणि सुधारकांचा उदय झाला.[४]

विसाव्या शतकाच्या आरंभी भारतीय राजकीय व्यवस्थेला स्वयंभू बनविण्यासाठी आणि भारतीय समाजव्यवस्थेत सुधारणा घडवून आणण्यासाठी भारतीय राजकारणात एक नवीन नेतृत्व उदयास आले. ते म्हणजे राष्ट्रपिता मोहनदास करमचंद गांधी. भारताला ब्रिटिश सत्तेच्या जोखडातून मुक्त करण्यात आणि शासनाची सूत्रे भूमिपुत्रांच्या हाती सोपविण्यात गांधींचा सिंहाचा वाटा आहे; म्हणून तर १९२० ते १९४७ हा कालखंड 'गांधीयुग' म्हणून ओळखला जातो. महात्मा गांधींनी देशाला स्वातंत्र्य मिळवून देण्यासाठी सत्याग्रहाची आंदोलने केली. देशाला स्वातंत्र्य मिळवून देणे एवढेच बापूजींचे मर्यादित स्वप्न नव्हते तर मरगळ आलेल्या समाजात चैतन्य निर्माण करणे; पीडित, शोषित, दारिद्र्यात पिचलेल्या समाजाचा उद्धार, खेड्यांचा विकास करून देशात पुन्हा रामराज्य निर्माण करण्यासाठी त्यांनी देह झिजविला. बलाढ्य इंग्रज साम्राज्याच्या विरोधात असहकार, सत्याग्रह, उपोषण अशा आयुधांचा वापर करत देशाला स्वातंत्र्य मिळवून दिले.[५]

१५ ऑगस्ट १९४७ रोजी भारत स्वतंत्र झाला. भारतीयांना स्वयंशासनाचा अधिकार मिळाला. गांधींच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्याचे आश्वासन भारतीय पुढारी भारतीय जनतेला देऊ लागले; मात्र स्वातंत्र्यानंतर काळ बदलला. गांधींच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्याची आश्वासने देणारे लोकनेते जनतेचे सेवक होण्याऐवजी जनतेचे भक्षक होत आहेत. शासनात भ्रष्टाचार, व्यभिचार वाढत चालला आहे. अशा शासनाला त्यांच्या कुकृत्याबद्दल जाब विचारण्याचे साहस सत्तेपुढे टिकत नाही; परंतु मागील ३०-३५ वर्षांमध्ये अशा काही व्यक्ती भारतीय समाज आणि राजकीय व्यवस्थेमध्ये उदयास

आल्या, ज्यांनी आपले संपूर्ण आयुष्य समाजसेवेसाठी अर्पण केले आहे. जनसेवा हीच त्यांची ईश्वरसेवा आहे. त्यांच्या अंगी शासनाने केलेल्या कुकृत्याबद्दल जाब विचारण्याची शक्ती आहे. अशा ध्येयवादी व्यक्तींमध्ये एक नाव अग्रक्रमाने घेतले जाते, ते म्हणजे **किसन बाबूराव हजारे ऊर्फ ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे**. त्यांना सत्तेचे कोणतेही कवच नाही. ज्यांनी सामाजिक कार्याचा वेगळा आदर्श निर्माण केला आहे, तो केवळ नैतिकतेवर. त्यांच्या कार्यपद्धतीबद्दल विविध मतप्रवाह आहे आणि ते असले तरी अण्णा हजारे यांनी उभारलेले सामाजिक कार्य विचारात घ्यावे असेच आहे.

संत ज्ञानदेव, संत नामदेव, संत तुकाराम आदी संतांनी मानवी मनाचा विकास, सामाजिक मूल्य, पर्यावरण, अध्यात्म, सेवा परमो धर्मः आदी मूल्यांचें मार्गदर्शन आपल्या अभंग, ओव्यांतून केले.

नगरेचि रचावी | जलाशये निर्मावी |

महावने लावावी | नानाविधे ||[६]

माऊलींच्या या ओवीतून पर्यावरणासंबंधीची त्यांची दूरदृष्टी स्पष्ट होते. याच ओवीचा आधार घेत उजाड, ओसाड झालेल्या गावाला हिरवळीच्या शालूचे पांघरूण घालण्याचं काम ज्येष्ठ समाजसेवक किसन बाबूराव हजारे ऊर्फ अण्णा हजारे यांनी केले. अण्णांच्या मातोश्री लक्ष्मीबाईंनी प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष कृतीतून अण्णांच्या मनावर संस्कार केले. त्यामुळेच अण्णांना संतसाहित्याची गोडी लागली. संतसाहित्याचं वाचन, चिंतन, मनन यातून त्यांनी मानवी जीवनाचे तत्त्वज्ञान आत्मसात केले. त्याच जोडीला स्वामी विवेकानंद, महात्मा गांधी यांसारख्या थोर विचारवंत महात्म्यांचा आदर्श आणि त्यांची समाजाप्रति असणारी मानवतेची भावना अण्णांच्या मनाला स्पर्शून गेली, त्यांच्याच जीवनचरित्रातून अण्णांना खऱ्या मानवी जीवनाचा अर्थ समजला.

मी कोण आहे? माझे स्वत:चे या भूमीवरचे अस्तित्व काय? स्थान कोणते आहे? माणूस म्हणून माझे नेमके कर्म कोणते ? मी केवळ माझ्यासाठी, माझ्या कुटुंबासाठी जगावे का? अशा अनेकविध प्रश्नांचे मोहोळ अण्णांच्या मनात निर्माण झाले. सातत्याने आत्मचिंतन करून, त्यांनी या प्रश्नांची उत्तरे मिळवली. अर्थात हा आधार होता संतसाहित्याचा, स्वामी विवेकानंद, महात्मा गांधींच्या विचारांचा.[७]

**'अण्णा हजारे गांधीवादी नेतृत्व'** या अध्ययनविषयाची निवड करण्याचे कारण म्हणजे राळेगणसिध्दी, ता. पारनेर, जि. अहमदनगर हे ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांचे गाव. 'प्रथम आपल्यापासून सुरवात केल्याशिवाय इतरांना सांगण्याचा अधिकार प्राप्त होत नाही.' म्हणून अण्णांनी राळेगणसिध्दीमध्ये परिवर्तन करण्यास सुरवात केली. हे काम करत असताना संघर्ष अटळ ठरला. दारूबंदी, नसबंदी , चराईबंदी, कुऱ्हाडबंदी आदी विविध कामे करत असताना  कधी आई बनून, तर कधी आईच्या नात्याने धाकदपटशा दाखवावा लागला. काळाबाजार, भ्रष्टाचार यांमुळे ज्यांची प्रतिमा डागळून कमी होणार होती ती अण्णा हजारे यांच्या विरोधात उभी राहिली. अशा वेळी विरोधकांना शब्दांनी उत्तर न देता अण्णा हजारे हे कामातून उत्तर देत गेले. परिणामी लोकांचा फायदा होत गेला. त्यामुळे हा विरोध आपोआप कमी होत गेला. आज राळेगण सिध्दी मध्ये परिवर्तन झाले. काही कोटी रुपयांची कामे श्रमदानातून उभी राहिली; पण अण्णा हजारे यांची वाटचाल संघर्षातूनच झाली.[८]

प्रस्तुत अध्ययनविषयात अण्णा हजारे यांच्या बालपणातील तसेच सैन्यात असताना जे संघर्षाचे प्रसंग आले, ते मांडले जाणार आहेत. सामाजिक परिवर्तने फक्त शब्दांतून किंवा अनुदानातून होत नाहीत; तर शब्दांना कृतीची जोड देणारे नेतृत्व हवे. असे शब्दांना कृतीची जोड देणारे  नेतृत्व राळेगण सिध्दी मधील ग्रामस्थांमधून निर्माण झाले. म्हणूनच राळेगणसिध्दी मध्ये पथदर्शक विकासकामे उभी

राहिली. आज समाजात नैतिक मूल्यांची घसरण होत आहे. भ्रष्टाचार हा शिष्टाचार होऊ पाहत आहे. हे थांबविण्यासाठी अण्णा खारीचा वाटा उचलत आहेत. एक सामान्य फाटका- तुटका कार्यकर्ता, की ज्याच्याकडे धन, दौलत नाही, सत्ता नाही, मंदिरातील ८ फुट बाय १० फुटांच्या खोलीत राहतो; मात्र ध्येयाने प्रेरित होऊन तो समाजासाठी काही करु इच्छितो. याची जाणीव अण्णा हजारे यांचे संघर्षमय जीवन वाटचालीतून होते. अण्णा हजारे यांच्या संघर्षमय जीवन वाटचालीतून विधायक मूल्ये समाजापर्यंत जावीत. यातून सामाजिक कार्य करण्यासाठी कार्यकर्त्यांना नैतिक बळ व प्रेरणा मिळावी. हे जाणून घेण्याच्या दृष्टीने या अध्ययनविषयाची निवड केली आहे.[१]

प्रस्तुत संशोधनाचा प्रमुख हेतू जसे ज्येष्ठ समाज सेवक अण्णा हजारे यांच्याजीवन चरित्राचा अभ्यास करणे; त्यांनी अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील राळेगणसिध्दी या आपल्या जन्मगावी केलेल्या विविध सुधारणांचा अभ्यास करणे हा आहे. तसेच त्यांनी विविध प्रश्नांवर सरकारशी संघर्ष करत असतांना, जनजागृती करत असतांना केलेल्या संघर्षाचा आढावा घेणे, त्याचबरोबर भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलन न्यास संघटनेचा अभ्यास करणे हा ही आहे. यातून एक प्रेरणात्मक ऐतिहासिक दस्तऐवज निर्माण निर्माण होऊ शकेल आणि काही निष्कर्षही समोर येतील. तसेच प्रस्तुत संशोधनासाठी ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांच्या जीवन चारित्राची, राळेगणसिध्दीची पूर्वस्थिती आणि अण्णा हजारे यांच्या योगदानातून राळेगणसिध्दी येथे झालेल्या आर्थिक, सामाजिक प्रगतीची अध्ययनविषय म्हणून निवड करण्यात आली आहे. तसेच अण्णा हजारे यांनी भ्रष्टाचारविरोधात पुकारलेल्या जनआंदोलनाचा अभ्यास, विविध कायदे संमत करण्यासाठी कराव्या लागलेल्या ११ वर्षांच्या

संघर्षाचा अभ्यास, त्यांना सोसाव्या लागणाऱ्या हाल-अपेष्टा आणि महाराष्ट्रातील जनतेने त्यांना दिलेला पाठिंबा याची संशोधन सह विषय म्हणून निवड करण्यात आली आहे.

सदरील संशोधनासाठी प्राथमिक तथ्य संकलन पद्धतीचा उपयोग केला आहे. प्राथमिक तथ्य संकलनासाठी राळेगणसिध्दी गावामध्ये अण्णा हजारे यांनी केलेल्या विकासकामांचा, स्थापन केलेल्या संस्थांचे निरीक्षण करून तथ्य संकलन केले. द्वितीय तथ्य संकलनामध्ये अण्णा हजारे यांच्या जीवनचरित्राशी संबंधित प्रकाशित, अप्रकाशित कागदपत्रे, त्यांनी स्थापन केलेल्या संस्थांच्या प्रगतीचे, विकासकामांचे अहवाल या माध्यमातून तथ्य संकलन केले.

सदरील विषयाचा संशोधनअभ्यास करण्यासाठी अण्णा हजारे यांचे जीवनचारित्र, जीवनात करावा लागलेला संघर्ष, राळेगणसिध्दीची पूर्वीची आणि आजची सामाजिक, राजकीय, आर्थिक प्रगतीचा अभ्यास आणि राळेगणसिध्दी गावाचा आदर्श घेऊन महाराष्ट्रातील विविध गावांत केलेल्या आर्थिक, सामाजिक प्रगतीचा अभ्यास हे कार्यक्षेत्र निवडले असून, प्रस्तुत अध्ययनासाठी अण्णा हजारे यांच्या जन्मापासून म्हणजे १९३८ पासून ते २००८ पर्यंतच्या त्यांच्या कार्यात्मक वाटचालीतील कालखंडाची निवड केली आहे.

अशा प्रकारे प्रस्तुत संशोधनात गांधीवाद, अण्णा हजारे यांचे जीवनचरित्र, राळेगणसिध्दीची पूर्वीची आणि आजची स्थिती, पाणलोट क्षेत्र विकास कार्यक्रम, माहितीचा अधिकार, ग्रामसभेचा अधिकार, भ्रष्टाचारविरोधी जनआंदोलनाचे कार्य, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी आदी घटकांचा समग्र अभ्यास करण्यात येणार आहे.

**संदर्भ :**


१) वाघ बाळासाहेब पां. - ग्रामविकासाची पाऊलवाट -राळेगणसिध्दी मिडिया सेंटर, राळेगणसिध्दी मुद्रण स्थळ, प्रभात प्रिंटिंग वर्क्स, पुणे, पृ. १०

२) परमपुज्य आठवले पांडुरंग शास्त्री यांची प्रवचने- विजिगीषु जीवनवाद, सद्विचार दर्शन,निर्मल निकेतन, मुंबई पृ.१०.

३) श्रीमद्‌भगवद्‌गीता : गीताप्रेस, गोरखपूर, अध्याय ४, श्लोक ७ वा, पृष्ठ क्र. ९७,९८.

४) गाठाळ साहेबराव : आधुनिक भारतीय विचारवंत, कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद. पृ.१४.

५) वाघ बाळासाहेब पां. - ग्रामविकासाची पाऊलवाट - राळेगणसिध्दी मिडिया सेंटर, राळेगणसिध्दी मुद्रण स्थळ, प्रभात प्रिंटिंग वर्क्स, पुणे, पृ. १२.

६) हजारे अण्णा : माझे गाव -माझे तीर्थ, स्वामी विवेकानंद कृतज्ञता निधी, ता.पारनेर जि. अहमदनगर, पृ.८.

७) वाघ बाळासाहेब पां. : ग्रामविकासाची पाऊलवाट - राळेगणसिध्दी मिडिया सेंटर, राळेगणसिध्दी मुद्रण स्थळ, प्रभात प्रिंटिंग वर्क्स, पुणे, पृ. ११.

८) हजारे अण्णा : वाट ही संघर्षाची, सिग्नेट पब्लिकेशन, पुणे, पृ. १३.

९) हजारे अण्णा : वाट ही संघर्षाची, सिग्नेट पब्लिकेशन, पुणे, पृ. १४, १६.